# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: : kvk_ndb@yahoo.com

**९५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६ फेब्रुवारी, २०२१**

जिल्हा : नंदुरबार

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२७ फेब्रुवारी,२०२१ ते ०३ मार्च,२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २७ | २८ | ०१ | ०२ | ०३ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३५ | ३५ | ३५ | ३५ | ३५ |
| किमान तापमान (अं.से.) | १८ | १९ | २० | १९ | १९ |
| ढग स्थिती (आकाश) | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३८ | ४१ | ३४ | ३० | १३ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १६ | १८ | १३ | १२ | ०८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ८ | ७ | ८ | ६ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार, पुढील पाच दिवस कमाल तापमान ३५ डिग्री सेल्सियस तर किमान तापमान १८ ते २० डिग्री सेल्सियस दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणी हवामान अंदाजानुसार ४ ते १० मार्च २०२१ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | पिकांवर फवारणी वारा शांत असताना करावी. सर्व पिके वेळेवर आंतरमशागत करून तणविरहीत ठेवावीत. पिकांवर किडीचा आणि रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये वेळेवर पीक संरक्षण करावे. |
| संदेश | | पुढील पाच दिवस जिल्ह्यात हवामान कोरडे राहुण्याची शक्यता आहे. |
| हरभरा | पक्वता ते काढणी | जिरायती हरभरा परिपक्व झाला असल्यास काढणी व मळणी करून घ्यावी. हरभरा उन्हात ६-७ दिवस वाळवून कोरड्या व हवेशीर जागी साठवणूक करावी. पीक ओलसर असताना काढणी करु नये. |
| गहू | वाढीची ते पक्वता अवस्था | उशिरा पेरलेले गहू पिकास पेरणीनंतर ८० ते ८५ दिवसांनी दाणे भरण्याच्या अवस्थेत चौथे पाणी द्यावे. वेळेवर पेरलेल्या गहू पिक पक्वता अवस्थेत असल्यास काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| रबी ज्वारी | पक्वता अवस्था | उशिरा पेरलेले रबी ज्वारी पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी. वेळेवर पेरलेले पिक पक्वता अवस्थेत असल्यास काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| भुईमुग | उगवण | पेरणीनंतर नांग्या आढळून आल्यास बी टोकून ते ताबडतोब भरावेत. भुईमुग पेरणीनंतर ४-५ दिवसांनी एक पाणी (आंबवणी) द्यावे, म्हणजे राहीलेले बियाणे उगवून येईल. नंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ८ ते १० दिवसाचे अंतराने १० ते १२ वेळा पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. |
| रबी मका | काढणी | मका पिकाची काढणी कणसावरील आवरण पिवळसर पांढरे आणि टणक झाल्यावर करावी. त्यासाठी ताटे न कापता कणसे सोलून खुडून घ्यावीत आणि सोललेली कणसे २ ते ३ दिवस उन्हात चांगली वाळवावीत. |
| कांदा | पक्वता येण्याची | रांगडा कांदा काढणीच्या १० ते १५ दिवस अगोदर पाणी देणे बंद करावे. पिकाची काढणी ५० टक्के पातींच्या माना पडल्यानंतर करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार

**दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४** **ईमेल: : kvk_ndb@yahoo.com**

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | |
| पपई | वाढीची अवस्था | मावा किडीचा प्रादुर्भाव दिसुन येताच नियंत्रणासाठी १५ दिवसांच्या अंतराने १० मि. लि. डायमिथोएट किंवा १० मि. लि. निमार्क प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| केळी | फळ वाढीची अवस्था | केळी बागेभोवती २ मी. अंतरावर सजीव कुंपनाच्या दोन ओळी लावाव्यात. सजीव कुंपणासाठी शेवरी किंवा गजराज गवत इत्यादींचा यांचा वापर करावा. बागेत चारही बाजुने सजिव कुंपण करावे. |
| आंबा | मोहोर फुटण्याची ते फळ येण्याची अवस्था | तापमानात वाढ होऊन आर्द्रतेत घट होण्याची शक्यता असल्याने, अशा वातावरणात फळधारणा झालेल्या आंबा बागेमधील वाटाणा ते सुपारी आकाराच्या फळांची गळ होण्याची शक्यता असते. ही फळगळ कमी करण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार आठवड्याच्या अंतराने फळे सुपारीच्या आकाराच्या अवस्थेपर्यंत द्यावे. |
| टरबूज | वाढीची अवस्था | लागवडीनंतर ३०,४५ व ६० दिवसांनी ५० किलो प्रति हेक्टर नत्र खताची मात्रा तीन समान हप्त्यात विभागून द्यावी व भर लावावी. |
| कुक्कुटपालन | बर्ड फ्लू काळजी | परसातील कुक्कुट पालनामध्ये हे करावे:<br>1. आपल्या कुक्कुटपालनामधील पक्षांचा स्थलांतरीत पक्षांशी संपर्क टाळा.<br>2. पक्ष्यांच्या पाण्याची व खाद्याची भांडी दररोज स्वच्छ धुवा.<br>3. कुक्कुट पक्ष्यांच्या खुराड्यात स्वच्छता ठेवा.<br>4. पक्षांना नियमितपणे लसीकरण करुन घ्या.<br>5. आपलेकडील पक्षी आजारी पडल्यास किंवा मरतुक झाल्यास त्याची माहिती तात्काळ नजिकच्या पशुवैद्यकीय अधिका-यास दया.<br><br>परसातील कुक्कुट पालनामध्ये हे करु नये:<br>1. कुक्कुटपक्ष्यांची विष्ठा व नाकातील स्त्राव यांसोबत संपर्क येऊ देऊ नका.<br>2. पक्षांना शक्यतो हाताळू नका, हाताळल्यास हात साबणाने स्वच्छ धुवा.<br>3. आपल्या पक्षांचे पाणी व खाद्य घराबाहेर उघडयावर ठेऊ नका.<br>4. परिसरात इतर प्रजातीचे पक्षी / प्राणी येणार नाहीत, याची काळजी घ्या. |
| ➢ हवामान अंदाज आणि कृषी सल्ला पाहण्यासाठी **“मेघदुत”** मोबाईल ॲपचा वापर करावा. | | |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : उपलब्ध नाही

ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार
दि. : २६/०२/२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-**
**जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**